# तिसरी परीक्षा प्रश्नपत्रिका २०२३

उमेदवाराचे नाव ____________________ वय ________________________
परीक्षा केंद्र ________________________________________________
परीक्षा संचालकांचे नाव ______________________ सही __________________
तारीख ________________________________________________________

## लेखी परीक्षा गुणदान

| प्रश्न | १ | २ | ३ | ५ | ६ | ७ | ८ | एकूण गुण | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | | | |
| पैकी गुण | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | ८० | ४० |

## तोंडी परीक्षा गुणदान

| | प्रार्थना श्लोक | कविता व अर्थ | छोटी / इतर माहिती | सामान्य ज्ञान माहिती | वाचन प्रश्नोत्तर | श्रवण प्रश्नोत्तर | अंतिम गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राप्त गुण | | | | | | | |
| पैकी गुण | ५ | १० | ५ | १० | १५ | १५ | ६० |

एकूण अंतिम गुण /१००

Produced by BMM Shala Exam Committee © Copyright.
Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

A)

## मुसळधार पावसाने वरोरा जलमय

काल दुपारी  झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण वरोरा परिसर जलमय झाला.दुपारी चारच्या सुमारास पाऊस सुरु झाला. पाच वाजेपर्यंत पावसाचा जोर  इतका वाढला, की बसस्थानकाचा परिसर चंद्रपूर रस्ता ,शिक्षकवसाहत या सर्व भागात तुडुंब पाणी भरले .संपूर्ण जुलै महिना कोरडा गेल्यामुळे वरोरेकर पावसाची वाट पाहत होते .आज पाऊस येईल असा अंदाज नव्हता. त्यामुळे छत्र्या रेनकोट बारदान घरीच  ठेऊन कामावर गेलेले लोक, शाळेत गेलेली मुले आपापल्या ठिकाणी अडकून पडली होती. संध्याकाळी साडेसहा वाजता पावसाचा जोर ओसरला व लोक घरी परतू लागले. वरोरा तालुक्यात इतका पाऊस असताना, शेजारचा भद्रावती तालुका व चंदपूर   जिल्ह्याचा इतर भाग कोरडाच राहिल्याचे समजते.उद्या दुपारपर्यंत संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे

प्रश्न :-

१) बातमी कशाविषयीची  आहे ?
२) बातमीचे शीर्षक काय आहे?
३) शीर्षकावरून तुम्हाला काय कळले ?
४) वरोरा मध्ये कोणकोणत्या भागात पाणीसाठले?
५) वरोरा जिल्हा कोणत्या तालुक्यात आहे?
६) ही बातमी कोणत्या  महिन्यातली आहे? ते कसे ठरले?

Produced by BMM Shala Exam Committee © Copyright.
Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

B)

## चतुर मुली

एका गावात राम नावाचा शेतकरी रहात होता. त्याला दोन मुली होत्या.एकदा त्या दोन्ही मुली जत्रेला जायला निघाल्या त्यांनी विचारलं, “बाबा, आम्ही तुमच्यासाठी काय आणू?” तो शेतकरी मोठया मुलीला म्हणाला, “तू माझ्यासाठी कागदामध्ये प्रकाश (Light) बांधून आण.”आणि छोट्या मुलीला म्हणाला, “तू माझ्यासाठी कागदामध्ये वारा (Wind) बांधून आण.” त्या दोघी सकाळी जत्रेला निघाल्या आणि संध्याकाळी घरी आल्या. शेतकऱ्याने मोठया मुलीला विचारलं , “मग काय काय आणलंत माझ्यासाठी?” यावर मोठी मुलगी आतून दिवा लावलेला कागदाचा कंदील घेऊन अली . त्यानंतर छोट्या मुलीने कागदाचा पंखा बाबांचा हाती दिला आणि म्हणाली, “बाबा, हा पंखा हातात घेऊन हलवीत रहा. त्यातून छान वारा येईल” आपल्या दोन्ही मुली चतुर असल्याचा शेतकऱ्याला अभिमान वाटला

प्रश्न :-

1. गोष्टीत किती जण आहेत?
2. शेतकऱ्याने मुलींना काय आणायला सांगितले ?
3. मोठ्या मुलीने कोणती वस्तू आणली?
4. छोट्या मुलीने कोणती वस्तू आणली?
5. शेतकऱ्याच्या मुली कश्या होत्या?

Produced by BMM Shala Exam Committee © Copyright.
Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**( C. )** एकमेकां साह्य करू अवघे धरू सुपंथ

“मुलांनो सगळे भराभर चला. परिपाठाच्या आधी केंद्रशाळेत पोचायला पाहिजे. स्पर्धा सुरु होतील लगेचच.” पुढे गेलेल्या बाई मागे वळत म्हणाल्या. केंद्रस्तरीय खेळांच्या स्पर्धांसाठी त्या शाळेतील मुलांना घेऊन निघाल्या होत्या. मयूर म्हणाला,”मी डब्यात गुळाची पोळी आणली आहे.”
जया म्हणाली,” मी अंड्याची पोळी आणि चपाती आणली आहे.”
“माझ्या डब्यात फोडणीचा भात आणि फोडणीची भाकरी आहे/” सायना म्हणाली.
“अरे, मी माझा डबाच घरी विसरलो. आता मी काय खाणार? मला उपाशीच राहावं लागणार बहुतेक” अभिजित चिंतेने म्हणाला.
“का? आम्ही आहोत की” सायना आणि जया एकदम बोलल्या. “आणि मी पण” मयूर म्हणाला.
बोलत बोलत सगळे केंद्रशाळेच्या दारात आले. बाईंनी हुश्श केले.

प्रश्न :-

१. बाई शाळेतील मुलांना घेऊन कुठे निघाल्या होत्या?
२. मयूरने डब्यात काय आणले होते?
३. डब्यात अंड्याची पोळी आणि चपाती कोणी आणली होती?
४. अभिजीतला उपाशी का राहावे लागणार होते?
५. सायना, जया आणि मयुरने अभिजीतला “आम्ही आहोत की” असे का सांगितले? (त्याचा अर्थ काय?)

Produced by BMM Shala Exam Committee © Copyright.
Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

**(D)** “भारतरत्न”

भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. हा सन्मान राष्ट्रीय सेवेसाठी दिला जातो. या राष्ट्रीय सेवांमधे कला, साहित्य, विज्ञान, सामाजिक सेवा आणि क्रीडा यांचा समावेश आहे. या सन्मानाचा प्रारंभ २ जानेवारी १९५४ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या काळात केला गेला. सुरुवातीला हा सर्वोच्च नागरी सन्मान मरणोत्तर देण्याची प्रथा नव्हती. इ.स. १९५५ मध्ये हा नागरी सन्मान मरणोत्तर सुद्‌धा देण्याची तरतूद करण्यात आली. हा नागरी सन्मान एका वर्षात जास्तीत जास्त तीन व्यक्तींना देण्यात येतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना इ.स. १९५४ साली पहिला भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरवण्यात आले.

प्रश्न :-

१. भारतरत्न हे काय आहे आणि हा सन्मान कशासाठी दिला जातो ?
२. भारतरत्न सन्मानासाठी कोणकोणत्या सेवांचा राष्ट्रीय सेवांमध्ये समावेश आहे?
३. या सन्मानाचा प्रारंभ कधी केला गेला?
४ . १९५५ साली कोणता महत्त्वाचा बदल ह्या सन्मान देण्याच्या प्रथेमध्ये करण्यात आला?
५. इ.स. १९५४ साली पहिला भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान कुणाला देण्यात आला?

Produced by BMM Shala Exam Committee © Copyright.
Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.